## जिल्हा परिषद अहमदनगर

# निर्मल ग्राम पुरस्कार योजना







ग्रामीण परिसर, प्रामुख्याने उघडयावरील शौचविधीने प्रदुषित होतो व त्याचे आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात. हे टाळण्यासाठी शौचालयाचा वापर अनिवार्य असल्यामुळे राज्य शासनाने सन १९९४ ते २००० या कालावधीत भरीव स्वरुपात व सरसकट पध्दतीने अनुदान देऊन, शौचालय बांधण्याचा व्यापक कार्यक्रम राबविला. तथापि त्यापैकी केवळ ५७ऽ शौचालयाचा नियमित वापर व उर्वरित शौचालयाचा अयोग्य कारणासाठी वापर होत असल्याचे आढळून आल्याने लाभार्थ्यांना अनुदान देण्यापेक्षा त्यांच्यात वर्तनबदल करण्याची गरज असल्याचे जाणवले. त्यामुळे शौचालय व एकंदरीत सर्वच स्वच्छतेसंदर्भात जनजागृती होऊन, ग्रामीण जनतेने या सवयींचा अंगीकार कायमस्वरुपी करावा म्हणून सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी सुरु केली.

या अभियानामुळे गांव परिसर स्वच्छ होऊ लागले. लोक, प्रसंगी कर्ज घेऊन ही शौचालय बांधू लागले. त्याच्या वापरात वाढ होऊ लागली. तरीही गावातील एक व्यक्ती जरी उघडयावर जात असेल तर ती संपूर्ण गावाचे आरोग्य दुषित करु शकते ही बाब विचारात घेऊन शासनाने हागणदारीमुक्त ही अभिनव चळवळ सर्व जिल्हयात राबविण्यास सुरुवात केली आहे. स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेमुळे समुहाच्या निर्णयशक्तीची व क्रियाशीलतेची प्रचीती आली असून तीचा योग्य उपयोग करुन हा अभिनव प्रयोग यशस्वी होऊ शकतो.

आपल्या परिसरातील स्वच्छतेसाठी लोकांना स्वयंसिध्द करण्यासंदर्भात राबविलेले स्वच्छता अभियान तसेच समुह निर्णयशक्तीला चालना देऊन गांव परिसर १००ऽ हागणदारीमुक्त करण्याचा अभिनव प्रयोग राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. संत गाडगेबाबा

स्वच्छता अभियानाचे यश पाहून आता याच नावाने हे अभियान मध्य प्रदेशात राबविले जात आहे. तसेच हागणदारीमुक्त गांव या प्रयोगामुळे उंचावणारी स्वच्छतेची स्थिती व आरोग्यमान विचारात घेऊन आता केंद्र शासनाने उघडयावरील प्रार्तविधीची पध्दत पूर्णपणे बंद करण्यासंदर्भात निर्मल पूरस्कार ही योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार १००१ घरे व शाळामध्ये शौचालयाची सुविधा व हागणदारीमुक्त व स्वच्छ परिसर असलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हयांना प्रोत्साहन बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच यासाठी कार्यरत असणा-या व उद्युक्त करणा-या संस्था व व्यक्तींना सुध्दा प्रोत्साहन देण्यात येणार आहे. आपल्या ग्रामपंचायतीने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केल्यामुळे जिल्हास्तरावर बक्षीस मिळवले आहे. आता अजूनही आपल्या गावात ज्यांच्याकडे शौचालय नाही त्यांना सर्वांना शौचालय बांधून घेण्यास व त्याचा नियमित वापर करण्यास उद्युक्त करावे आणि आपल्या गावातील एकही व्यक्ती उघडयावर प्रार्तविधी करणार नाही याची दक्षता घ्यावी. पर्यायाने आपल्या गावातील स्वच्छतेचा दर्जा उंचवावा.

निर्मल ग्राम पुरस्कारासाठी केवळ ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हयांचे प्रस्ताव राज्यशासनामार्फत केंद्र शासनास पाठवावयाचे आहेत. पुरस्कार योजना सन २००३-०४ पासून अंमलात आली असल्याने आपली ग्रामपंचायत सदर स्पर्धेसाठी पात्र ठरत असल्यास आपला प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यासाठी प्रथम पडताळणीसाठी आपल्या जिल्हा परिषदेमार्फत या विभागास सादर करावा.

केंद्र शासनाने निर्मल ग्राम पुरस्कार योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात येणा-या पुरस्कार रकमेत खालीलप्रमाणे सुधारणा केलेल्या आहेत. हा बदल दि. ८/९/२००६ पासून अंमलात येणार आहे.

| | |
|---|---|
| १००० पेक्षा कमी लोकसंख्या | रु.०.५० लाख |
| १००० ते २००० लोकसंख्या | रु. १.०० लाख |
| २००० ते ५००० लोकसंख्या | रु. २.०० लाख |
| ५००० ते १०००० लोकसंख्या | रु. ४०० लाख |
| १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या | रु. ५.०० लाख |

या पुरस्कार रकमेचा विनियोग संबंधित ग्रामपंचायतीच्या परिसरातील स्वच्छतेच्या सुविधा सुधारण्यासाठी व देखभालीसाठी करावा.